दैनिक
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
# महावृत्त
संपादक - अशोक हनवते. मो - 9421094991,7264079990

लातूर   वर्ष ४ थे   अंक ७९ वा रविवार दि.२५ ऑगस्ट २०२४   पृष्ठे ४   स्वागत मूल्य २ रू.

## मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील- ना. संजय बनसोडे

### लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी ५० लाख रुपये देणार





लातूर :- मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच आर्टी संस्था स्थापन करण्यात आली आहे. उदगीर तालुक्यातही समाजाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले. उदगीर शहरातील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ उभारण्यात येणाऱ्या साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. आमदार अमित गोरखे, सचिन साठे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, नगरपरिषद मुख्याधिकारी सुंदर बोंदर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, बन्सीलाल कांबळे, अंबादास सगट यांच्यासह पदाधिकारी, नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी ना. संजय बनसोडे यांच्यासह मान्यवरांचे फुलांच्या पाकळ्या उधळून स्वागत करण्यात आले. ना. बनसोडे यांच्या हस्ते कुदळ मारून इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून या इमारतीसाठी १४ कोटी ९६ लाख रुपये निधी उदगीर नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्यात आला आहे. तळ मजल्यावर पार्किंगची व्यवस्था असलेल्या या इमारतीमध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका असणार आहे.

मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे चिराग नगरमध्ये लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरात वस्ताद लहुजी साळवे यांचे स्मारक होणार असून लवकरच त्याचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे म्हणाले. उदगीर शहरात अतिशय मोक्याच्या जागेवर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका इमारतीची उभारणी होत आहे. याठिकाणी आणखी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी ५० लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी आणखी ५० लाख रुपये निधी दिला जाईल, असे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच जळकोट शहरात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा आणि भव्य सभागृह उभारण्यात आले आहे. उदगीर शहरात विविध ठिकाणी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे समाज भवन उभारण्यात आल्याचे ना. बनसोडे म्हणाले. राज्य शासन सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करीत असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. पुढील काळात ही रक्कम दुप्पट करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्य शासन मातंग समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवित आहे. बार्टीच्या धर्तीवर सुरू करण्यात आलेल्या आर्टी संस्थेमुळे मातंग समाजातील युवकांना स्पर्धा परीक्षा, संशोधनासाठी मदत होवून समाजाचा विकास होईल, असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून सर्वसामान्य, कष्टकरी माणसाचे जीवन रेखाटले. या समाजाच्या विकासाबाबत चिंतन करून साहित्य निर्मिती केली. त्यांचे विचार प्रत्येकाने समजून घेवून कोणताही जातीभेद न मानता समाजासाठी काम करावे, असे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे वंशज सचिन साठे यावेळी म्हणाले. प्रा. अंबादास सगट, रामचंद्र तिरुके, बन्सीलाल कांबळे, पप्पू गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पंडीत सूर्यवंशी यांनी केले, शिवाजी देवताळे यांनी सूत्रसंचालन केले.

## खरोळा येथील देवीच्या मंदिरासमोर सभागृहाच्या बांधकामाचा ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुभारंभ



लातूर : - भारतीय जनता पार्टीचे नेते विधान परिषदेचे सदस्य आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात सभागृह बांधकामासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी देण्यात आला असून या सभागृह बांधकामाचा भूमिपूजन भाजपाचे युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात झाला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून अनेक विकास कामांना विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळाला. मिळालेल्या निधीतून विकासाची कामे सर्वत्र होत आहेत त्याचाच एक भाग स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात भाविकांच्या मागणीनुसार सभागृह बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी आ. कराड साहेब यांनी मंजूर केला. सदरील सभागृह बांधकामाचा शुभारंभ भाजपाचे युवा नेते माननीय ऋषिकेश दादा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आला.

खरोळा येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिर देवस्थानास आमदार रमेश आप्पा कराड साहेब यांनी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून दिल्याने या मंदिर परिसरात विविध विकास कामाबरोबरच भाविक भक्तांना मोठ्या प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध होतील असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकासाला खऱ्या अर्थाने आ. रमेश आप्पा कराड यांच्या माध्यमातून गती मिळाली असल्याचे बोलून दाखविले.

यावेळी भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, माजी जिप सदस्य सुरेंद्र गोडभरले, रमाकांत फुलारी, बाळाप्पा हेणे, बालाजी मानमोडे, हनुमंत राऊतराव, मोहन राऊतराव, राजकुमार मानमोडे, ज्ञानोबा भोपी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेलापूर मध्ये रंगला, जेष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा

## सिने कलावंतांच्या उपस्थिती ने आणली कार्यक्रमात रंगत

नवी मुंबई / के. एच. हनवते :- सीबीडी बेलापूर मधील मँगो गार्डन जेष्ठ नागरिक संघातील जेष्ठ नागरिकांचा सन्मान सोहळा नुकताच बेलापूर मध्ये संपन्न झाला. यावेळी बेलापूर मधील, ऑडव्होकेट आणि सॉलिसीटर्स लेवी रुबेन्स यांच्या वतीने, एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन बेलापूर मधील होटेल, ग्रँड ५१ मध्ये करण्यात आले होते. सर्व जेष्ठ नागरिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. मँगो गार्डन जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा लता पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला सिनेस्टार गुलशन ग्रोव्हर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते, या कार्यक्रमात महाभारत मालिकेतील अर्जुन फिरोज खान, बलराम सागर सोलंकी, अभिनेत्री पम्मी मोटन, एजाज खान, शहजाद खान आदी कलावंतानी हजेरी लावली होती. सिनेकलावंतांच्या हस्ते सर्व जेष्ठ नागरिकांचा सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी उपस्थित कलाकारांनी आपल्या गाण्याच्या तालावर सर्वांना ठेका धरायला लावला. सर्व जेष्ठ नागरिकांनी या कलाकारांच्या तालावर ठेका धरत कार्यक्रमात एकच रंगत आणली. या सन्मान सोहळ्यात स्वतः लेवी रूबेन यांनी आपल्या सुमधुर आवाजात विविध गाणी गात, उपस्थितांचे मनोरंजन केले. समाजकार्यात नेहमी अग्रेसर असणारे लेवी रूबेन नेहमी सर्वांना मदत करायला पुढे असतात. जेष्ठ नागरिकांच्या आयुष्यात एक आंनदाचा क्षण देता आला याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाचे सचिव : श्री सुरेश पोटे यांचा व जेष्ठ पत्रकार विश्वरथ नायर यांचा ही जेष्ठ पत्रकार म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. जेष्ठ नागरिक म्हणजे घरातील दुर्लक्षित व्यक्ती म्हणूंन त्यांच्या कडे पाहिले जाते. मात्र आत्ता अश्या प्रकारे भव्य सन्मान झाल्याने आपण भारावून गेल्याची प्रतिक्रिया सर्वच जेष्ठ नागरिकांनी यावेळी व्यक्त केली. तर जेष्ठ नागरिकांना सन्मानाची भावना वाढीस लागावी यासाठी हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आल्याचे मँगो गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्ष लता पवार यांनी सांगितले.




## कामाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी जन सन्मान पदयात्रा

## जनसन्मान पदयात्रेचा आ. सांभाजी पाटील निलंगेकर यांच्याकडून श्रीगणेशा

**मराठा क्रांती मोर्चाचा पाठिंबा...**

आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी काढलेल्या जनसन्मान पदयात्रेस मराठा क्रांती मोर्चाने पाठिंबा दिला आहे. मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर पाठिंब्याचे पत्र आ. निलंगेकर यांना सुपूर्द केले.कार्यकर्त्यांनी पदयात्रेत सहभागही नोंदवला.

**जनतेच्या सन्मानासाठी पहिलीच पदयात्रा ...**

आजवर अनेक यात्रा व पदयात्रा काढण्यात आल्या परंतु जनतेच्या सन्मानासाठी काढण्यात आलेली ही पहिलीच पदयात्रा ठरली.आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या नेतृत्वात मतदारसंघातील ३०० किलोमीटरचा प्रवास या पदयात्रेच्या माध्यमातून केला जाणार आहे.यात शासनाच्या योजनांची माहिती देत विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजनही केले जात आहे. त्यामुळे या पदयात्रेचे गावागावातील नागरिकांकडून उत्साहात स्वागत केले जात आहे.

लातूर/प्रतिनिधी : निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांच्या जन सन्मान पदयात्रेची सुरुवात शनिवारी (दि.२४ ) माकणी गावातून करण्यात आली.माकणीच्या जागृत हनुमान मंदिरात दर्शन घेऊन पदयात्रेस प्रारंभ झाला. गेल्या पाच वर्षांत केलेल्या विविध विकास कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी ही पदयात्रा असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले.ज्या पद्धतीने वारकरी पांडुरंगाची वारी करतात त्याचप्रकारे जनतेच्या रूपात ज्या पांडुरंगाला मी पाहतो,त्या मायबाप जनतेचा सन्मान करण्यासाठी येणारे १२ दिवस ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करणार असल्याचे त्यांनी सांगितले. महिला भगिनींचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली.यातून माता- भगिनींना प्रतिमाह १,५०० रुपये देण्यात येत असून यामुळे महिलांचे आर्थिक सबलीकरण होणार आहे. त्याचबरोबर मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण देखील सरकारने मोफत केले आहे.शेतकरी बांधवांच्या समृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले. कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणला.कोयाची वाडी आणि चन्नाचीवाडी या दोन्ही वाड्या गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्षित होत्या.गेल्या काळात येथे सातत्याने विकास झाला असून आणखी बरीच विकासकामे प्रगतीपथावर आहेत. आगामी काळातही विकासाची ही गंगा अशीच वाहत राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या प्रसंगी शासकीय योजनेचे लाभार्थी ठरलेले गावकरी तसेच महिला भगिनींना प्रशस्तीपत्र देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला. या जनसन्मान पदयात्रेवर विरोधकांकडून टीका केली जात आहे. टीका करण्याचे काम अगदी सोपे असल्यामुळे मी ते काम विरोधकांना दिले असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले. कोविडच्या काळात ज्यावेळी सर्व नेतेमंडळी घरात बसून होती त्यावेळी,हा संभाजीराव तुमच्या सेवेत होता,असेही त्यांनी सांगितले.दरम्यान आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मातोश्री माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर यादेखील जनसमान पदयात्रेस आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होत्या.आपण जीवन जगताना तसेच राजकीय आणि सामाजिक काम करताना कुठलाही बडेजाव करायचा नाही. जेणेकरून समोरून आलेल्या माणसाला आपण त्यांचा माणूस वाटलो पाहिजे,असे बाळकडू मी त्यांना दिल्याचे म्हणाल्या. या प्रसंगी बसवकल्याचे आ. शरनू सलगर, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर माजी जि. प. अध्यक्ष राहूल केंद्रे, माजी सभापती संजय दोरवे, जिल्हा सरचिटणीस भारत चामे यांनी मनोगत व्यक्त करत आ. निलंगेकरांच्या विकासकामंचे व त्यांच्या करायचे कौतुक करत हे नेतृत्व मतदार संघातील जनतेने तळ हाताच्या फोडप्रमाणे जपावे असे आवाहन केले. आ.निलंगेकर यांचे शेकडो महिलांनी राखी बांधून औक्षण केले. यावेळी आ.निलंगेकर यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.माकणीचे सरपंच तुकाराम सुर्यवंशी, चेअरमन,ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. माकणी (थोर) येथे विविध विकास कामाचा आ.निलंगेकर यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला.तेथून कोयाचीवाडी आणि चन्नाचीवाडी येथील नागरिकांनी गावात आगमन होताच पदयात्रेवर जेसीबीने पुष्पवृष्टी केली.गावात विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. माकणी,कोयाचीवाडी चन्नाचीवाडी,सावरी,माने जवळगा शेळगी येथील लाडकी बहिण योजनेसाठी पात्र महिलांना आ.निलंगेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. निलंगा तालुक्यातील शेळगी येथे या जन सन्मान पदयात्रेचा मुक्काम असून येथील गावक-यांशी आ. निलंगेकर संवाद साधणार आहेत.गाव,वाडी-वस्ती येथील नागरिक 'विकासाची वारी- जनतेच्या दारी' या पदयात्रेत सहभागी होऊन समर्थन देत आहेत. निलंगा मतदारसंघात निघालेल्या जनसन्मान पदयात्रेस मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जाहीर पाठींबा देत आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निघालेल्या पदयात्रेत सहभागी होऊन पाठींब्याचे पत्र दिले. यावेळी बसवकल्याणचे आ.शरणूजी सलगर, माजी खा. सुनील गायकवाड,माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होणराव, अरविंद पाटील निलंगेकर,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर,माजी जि.प. अध्यक्ष मिलिंद लातूरे, निलंगा विधानसभा प्रभारी दगडु सांळुके,दगडु सांळुके,गणेश आकडे, भाजपा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,संघटन सरचिटणीस तथा माजी जि.प. सभापती संजय दोरवे,माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे,शीतल मालू,शोभाताई पाटील, श्रीकांत पाटील, संदीप सगरे,नागुजी येरोळे, शिवाजी टेकले,रामलिंग टेकले,उध्दव सगरे, मधुकर सगरे,ज्ञानोबा सगरे, महात्मा सगरे,विद्यानंद सगरे,प्रल्हाद पाटील आदींसह पंचक्रोशीतील नागरिक व पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय....

# बदलते हवामान आणि पीकपद्धती.

हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांपासून कृषी उत्पादनांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेतकर्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर करणे महत्त्वाचे आहे. प्राचीन काळापासून शेतकरी स्थानिक हवामानाच्या परिस्थितीला अनुसरून पिकांची निवड करत होते. मात्र, आता हवामान बदलामुळे पारंपरिक पिके टिकवून ठेवणे अवघड होत आहे. बदलत्या हवामानाच्या परिस्थितीत काही पिके अनुकूलता दाखवू शकतात, तर काहींचा उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. या संकटावर मात करण्यासाठी शेतकर्यांनी अनुकूल पिके घेण्याची गरज आहे. अनुकूल पिके म्हणजे अशी पिके जी विशिष्ट हवामान परिस्थितीत वाढू शकतात, त्यात वाढीव उत्पादन देऊ शकतात आणि त्यांची प्रतिकारशक्ती जास्त असते. उदाहरणार्थ, तापमान वाढीमुळे वाढणार्या तापमानात तग धरू शकणारी पिके, कमी पाण्यावर वाढू शकणारी पिके आणि कीड प्रतिकारक पिके यांचा समावेश होतो. असे अनुकूल पिके घेणे शेतकर्यांसाठी ङ्गायदेशीर ठरू शकते. यामुळे पाण्याची बचत होते, जमिनीचे संरक्षण होते, उत्पादन वाढते आणि शेतीची आर्थिक स्थिरता वाढते. तसेच अनुकूल पिके घेतल्यामुळे शेतकर्यांना बदलत्या हवामानामुळे होणारे नुकसान कमी करता येते. शेतकर्यांनी अनुकूल पिके घेण्यासाठी संशोधन आणि प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. त्यांना नवीन पद्धती, तंत्रज्ञान आणि पिकांच्या विविधतांबद्दल माहिती देणे गरजेचे आहे. शास्त्रज्ञ, कृषी विद्यापीठे आणि सरकारी संस्थांनी शेतकर्यांना अनुकूल पिकांच्या बाबतीत मार्गदर्शन करायला हवे. त्यासाठी विविध कार्यशाळा, प्रात्यक्षिके आणि शेतकरी मेळावे आयोजित करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातील काही भागात पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे बाजरी, ज्वारी, मका आणि मूग या पिकांना प्राधान्य दिले जाते. या पिकांची पाण्याची गरज कमी असते आणि ती अवर्षणप्रवण क्षेत्रात सहज उगवता येतात. तसेच काही भागात जलवायू अनुकूल भाताच्या विविध जाती घेतल्या जातात, ज्यामुळे पाण्याचा वापर कमी होतो आणि उत्पादन वाढते. जैविक शेतीत वापरल्या जाणार्या पद्धतींचा परिणाम म्हणून जमिनीतील आर्द्रता टिकवून ठेवली जाते, ज्यामुळे अनुकूल पिकांची वाढ अधिक चांगली होते. हवामान बदलाच्या नकारात्मक परिणामांमुळे आपली अन्नसाखळी धोक्यात आली आहे, ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपलेली नाही. मान्सूनच्या पद्धतीत बदल, प्राणघातक उष्णतेच्या लाटा, समुद्राची पातळी वाढणे आणि वारंवार येणारी वादळे यामुळे कृषी उत्पादनाला धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात, इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंजच्या अलीकडील अहवालात या धोक्यांबाबत इशारा देण्यात आला आहे. निश्चितच, हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांनी आपल्या शेताचे दार ठोठावले आहे, ज्याचा सामना नवीन धोरणे करून करता येऊ शकतो. हवामान बदलाच्या परिणामांमुळे शेती क्षेत्र आणि पीक उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेषत: मान्सूनच्या पावसावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या छोट्या शेतकर्यांसाठी हे संकट मोठे आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत उत्पादन अबाधित ठेवण्यासाठी विशेष पुढाकार घेण्याची गरज आहे. या दिशेने भारतीय कृषी संशोधन परिषदेने एक दशकापूर्वी हवामान-अनुकूल शेतीतील नवकल्पनांवर आपला प्रकल्प सुरू केला होता. पंतप्रधानांच्या हस्ते उच्च उत्पादन देणार्या, हवामानास अनुकूल असणार्या पीक वाणांचे लाँचिंग हा या मालिकेचा एक भाग आहे. यासंदर्भात सरकारचे म्हणणे आहे की, गव्हाचे उच्च उत्पादन देणारे बियाणे यशस्वीरित्या तयार केल्यानंतर, हवामान प्रतिरोधक बियाण्यांसह धानाचे क्षेत्र वाढवणे हे त्यांचे प्राधान्य आहे. निःसंशयपणे या भयंकर पर्यावरणीय आव्हानाचा मुकाबला आपण शाश्वत स्वदेशी उपायांद्वारेच करू शकतो. यामध्ये खासगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्याची गरज भासू लागली आहे. देशात हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी राबविल्या जाणार्या कार्यक्रमांची कमतरता नाही, परंतु गरज आहे ती उपलब्ध संसाधनांच्या विवेकपूर्ण व्यवस्थापनाला चालना देण्याची. हवामान बदलाच्या हानिकारक प्रभावांपासून कृषी उत्पादनांचे संरक्षण करण्यासाठी आणि शेतकर्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी संसाधनांचा अधिक चांगला वापर करणे खूप महत्त्वाचे आहे. यासोबतच जलस्रोतांचे संवर्धन, वनक्षेत्राचे संरक्षण, मृदा आरोग्य पत्रिका आदी योजनांच्या माध्यमातून जमिनीची सुपीकता वाढविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. शेतीत कृत्रिम खतांच्या वापरावरही नियंत्रण ठेवले पाहिजे. या संदर्भात पीक विविधीकरण कार्यक्रमाला गती देण्याची गरज असून यासाठी शेतकर्यांना जागरूक करून प्रोत्साहन देण्याची गरज आहे. देशातील अनेक राज्यांमध्ये सेंद्रिय शेतीला मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहन दिले जात आहे, हे आनंददायी आहे. मात्र हा कार्यक्रम देशव्यापी व्हायला हवा. या दिशेने प्रोत्साहन योजना शेतकर्यांसाठी सेंद्रिय शेतीचा अवलंब करण्याचा मार्ग मोकळा करू शकतात. या दिशेने केवळ नवीन तंत्रज्ञान निर्माण करून समस्या सोडवता येणार नाही, हेही वास्तव आहे. वैज्ञानिक संशोधन शेतांच्या बांधापर्यंत नेण्याची गरज आहे. त्यांचा वापर करून शेतकरी पिकांच्या संवर्धनाला गती देऊ शकतात. किंबहुना प्रत्यक्षात शेतकर्याला त्याच्यासाठी काय उपयुक्त आहे याचे व्यावहारिक समाधान करणे देखील आवश्यक आहे. हवामान अनुकूल कृषी पद्धतींचा अवलंब करण्यासाठी देशातील शेतकर्यांमध्ये देशव्यापी एकमत निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी आधुनिक संशोधनाबरोबरच अनुभवजन्य अभ्यासालाही प्राधान्य द्यायला हवे. या प्रयत्नांना खर्या अर्थाने गती देण्यासाठी संशोधनासाठी पुरेशी आर्थिक संसाधने उपलब्ध करून देण्याची आणि शेतीसाठी उपयुक्त निष्कर्ष शेतकर्यांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. या वाढत्या भीषण परिस्थितीत या आव्हानाचा राष्ट्रीय प्राधान्यक्रमांमध्ये समावेश करण्याची गरज आहे. आपण जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहोत हे वास्तव जाणून मोठ्या लोकसंख्येच्या सामाजिक सुरक्षेसाठी अनेक अन्नधान्य योजना सरकारी धान्य कोठारातून चालवल्या जात आहेत, ज्याची पूर्तता अन्नधान्य उत्पादन वाढवूनच होऊ शकते.

# पुरोगामी महाराष्ट्रात जिजाऊ... सावित्री... रमाईच्या लेकी असुरक्षितच..!

महाराष्ट्र ही संत महापुरुषांची भूमी म्हणून ओळखली जाते. एक पुरोगामी महाराष्ट्र म्हणून महाराष्ट्राची ओळख देशभर आहे याबद्दल दुमत नाही. संत गाडगे महाराज, संत कबीर, संत रविदास, संत तुकाराम महाराज, संत तुकडोजी महाराज इत्यादी संत मंडळी हे महाराष्ट्राच्या भूमीत जन्माला आली. आपलं संपूर्ण आयुष्य या संतांनी समाजाच्या प्रबोधनासाठी उन्नतीसाठी खर्ची घातले तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, शाहू महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे या महापुरुषांनी देखील या महाराष्ट्राच्या जडणघडवीत सिंहाचा वाटा उचललेला आहे. या सर्व संत महापुरुषांनी समाजाला समितेची, मैत्रीची ,बंधू भावाची शिकवण दिली. समाजातील अंधश्रद्धा, जातीवाद, स्त्री-पुरुष, भेदाभेद लिंगभेद महिलावर होणारे अन्याय अत्याचार याविरुद्ध जागृती केली. विषमतावादी व्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारले मात्र आजही अशा संत महापुरुषांच्या महाराष्ट्रात सातत्याने कुठे ना कुठे मनाला संताप येणाऱ्या घटना घडतात .माणुसकीला कलंकित करणाऱ्या घटना घडतात. हे फार महाराष्ट्रासाठी लाजिरवाणी बाब आहे. असे म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषांच्या मागे एका स्त्रीचा हात असतो. जिच्या हाती शिक्षणाची दोरी... ती जगाचा उद्धार करी...मात्र आज समाजात स्त्रीच असुरक्षित असताना दिसून येते. आज आपली पत्नी ,आई, बहिण जर एकटी घराबाहेर शाळेमध्ये बाजारात किंवा बाहेरगावी जात असेल तर ती एकटी घरी सुखरूप पोहोचेल की नाही याची प्रत्येक व्यक्तीला चिंता वाटू लागली. सर्व राजकारणी वरील महापुरुषांचे नाव उठता बसता घेतात. मात्र काही अपवाद लोक याच महापुरुषांची विचार पायदळी तुटवतात. महाराष्ट्रासह देशभरात महिला विनयभंग, लैंगिक, बलात्कार अत्याचाराच्या घटनेत जनसेवेसाठी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी , राजकीय क्षेत्रातील व्यक्ती मोठ्या प्रमाणात गुन्हेगार म्हणून आढळून आले आहे.त्यामुळेच समाजात बलात्कारासारख्या घटना सातत्याने घडत आहे. म्हणून सामान्य माणुस येथील निस्टुर राज्य सत्तेचा निषेध करत आहे. याला कारणही तसेच आहे. महाराष्ट्र राज्यात एका महिन्याला ६२६ महिला अत्याचाराच्या घटना घडतात. एका बाजूने संपूर्ण महाराष्ट्र स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना १३ ऑगस्ट २०२४ रोजी बदलापूर येथील शाळेतील दोन अल्पवयीन मुलींवर बलात्काराची घटना घडली आणि संपूर्ण समाज मन दुःखी झाल. या घटनेचा निषेध करत नाही ,तेच अकोला येथे २० ऑगस्ट रोजी शिक्षकाकडूनच सहा मुलींचा विनयभंग झाला. तर याच दिवशी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथील ठाण्यात मतिमंद मुलीवर अत्याचार चांदीवली येथे चिमुकलीवर लैंगिक अत्याचार परत याच दिवशी २० ऑगस्टला लातूर येथे साडेचार वर्षाच्या लहान मुलीवर लैंगिक छळछाड करून अत्याचार २१ ऑगस्ट नाशिक येथे सुद्धा साडेचार वर्षाच्या मुलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार याच दिवशी पुणे येथे अल्पवयीन तरुणीवर मैत्रीच्या मैत्रिणीच्या मदतीने दोन नाराधामानी केला लैंगिक अत्याचार. एकीकडे महाराष्ट्र शासन लाडकी बहीण योजना सुरू करून पंधराशे रुपये प्रति महिना योजना सुरू करून महिलांविषयी आदर सहानुभूती दाखवत मुख्यमंत्री लाडकी बहिणी योजना सुरू करून त्याचा मोठ्या प्रमाणात प्रसार माध्यमांवर जाहिरात बाजी करत महिलांचा पाठिंबा मिळवण्याचा केविलवाना प्रयत्न करत असताना दुसरीकडे मात्र लाडक्या बहिणीच्या मुली लैंगिक अत्याचाराच्या बळी ठरत आहे. ऑगस्ट महिन्याच्या आठवड्याभरातील अल्पवयीन मुलीवर अत्याचाराच्या घटना मानवतेला काळीमा फासणाऱ्या घटना होय . एकंदरीत वरील घटनांमुळे पुरोगामी महाराष्ट्रातील जिजाऊ... सावित्री... अहिल्या बाई... रमाईच्या लेकी दिवसेंदिवस असुरक्षितच दिसत आहे. असे म्हटल्यास ते चुकीचे ठरणार नाही. म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी आणि गृहमंत्र्यांने वरील घटनांची स्वतःहून जबाबदारी घेत तात्काळ राजीनामा दिला पाहिजे. वाढत्या महिला अत्याचार आणि बलात्कारांच्या घटना रोखण्यासाठी शासनाने वेळ काढू पणा धोरण बाजूला ठेवून आरोपीला तात्काळ शिक्षा देऊन महिला सुरक्षितेसाठी अधिक गतिमानतेने कार्य करण्याची गरज आहे.

**************

लेखक - सिद्धार्थ अशोक तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा ,जि. बुलढाणा
मो. नं.९३०९७६७३८८

# पोलिसाच्या वर्दीतील माणुसकी जागवा माणुसकी वाचवा.



राज्यात आणि देशात महिलांचे,शाळाकॉलेज च्या मुलीचे जे लैंगिक शोषण होत आहे त्याला मुख्य जबाबदार पोलिस प्रशासन एकूण यंत्रणा जबाबदार आहे. असे सर्व सामान्य माणसं उघड बोलतांना दिसतात. कारण आज पर्यन्त महिलांचे,शाळाकॉलेजच्या मुलीचे लैंगिक शोषण करणाऱ्या किंवा बलत्कार करणाऱ्या आरोपीला लोकांच्या लक्षात राहील अशी शिक्षा झाल्याचे दिसत नाही. त्यामुळेच कायद्याची भीती सहसहा जातीचा व पैसाचा,राजकीय नेत्याचा आशीर्वाद असलेल्या माणसांना राहिला नाही.खेड्या पासून शहरा पर्यन्त लैंगिक शोषण,विनयभंग,बलत्कार वाढत चालले आहेत. अनेक प्रकरण पोलीसाच्या वर्दीतील माणूस जागा नसल्यामुळेच दडपल्या जात आहेत.पोलिसातील माणुसकी जागवली तर अनेक गुन्हेगारांना शिक्षा होऊन गुन्हेगारांना जरब बसू शकते. पुढे कोणी महिलांचे,शाळाकॉलेज च्या मुलीचे जे लैंगिक शोषण करण्याची हिंमत करणार नाहीत. महिलांचे,शाळाकॉलेज च्या मुलीचे जे लैंगिक शोषण झाल्यावर पोलिस दखल घेत नाही. गुन्हा दाखल करीत नाही.पण जनआंदोलन झाल्या नंतर दडपणामुळे गुन्हा दाखल केल्या जातो आणि जन आंदोलन शांत केल्या जाते.म्हणूनच दिवसेंदिवस गुन्हा झाल्या नंतर आरोपी पकडल्या जातो. पण काही दिवसांनी ते प्रकरण पोलिसानी न्यायालयात सादर केलेल्या कागदपत्रा द्वारे आरोपी निर्दोष सुटतो. (यांचे लक्षवेधी उदाहरण खैरलांजी हत्याकांड आणि सरकारी वकील उज्वल निकम हे आहे.) याला एकूण पोलिस यंत्रणा जबाबदार नाही काय?. पोलिस राजकीय दडपणामुळे कर्तव्य दक्षता दाखवत नाही. हे ही सत्य आहे. पणकाही कर्तव्यदक्ष पोलिस अधिकारी कोणत्या ही दडपणाला बळी न पडता गुन्हेगारांना शिक्षा होईल असे साक्षीपुरावे ,जवाबनामे,पंचनामे,डॉक्टर रिपोर्ट,सर्व योग्य कागद पत्रे न्यायालया समोर प्रामाणिकपणे सादर केल्यास गुन्हेगारास शिक्षा होऊ शकते. त्याचे उत्तम उदाहरण देशातील सर्वात लोकप्रिय हिंदू संत आसाराम बापू यांचे आहे. राजकीय,धार्मिक,जातीय दंगली घडविणाऱ्या भक्ताच्या दडपणाला बळी न पडता ज्या पोलिस अधिकाऱ्यानी ही केस हाताळली तो आदर्श पोलीसा समोर असायला हवा. कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्यामुळेच संत आसाराम सारखे अनेक ढोंगी संत जेल मध्ये शिक्षा भोगत आहेत. म्हणूनच पोलिसांना जाहीर नम्र विनंती पोलिसावर्दीतील माणुसकी जागवा माणुसकी वाचवा.

काही दिवस पूर्वी आपण वाचले असेल की वाकोला पोलिस ठाण्यातील सहाय्यक उपनिरीक्षकाने वरिष्ट पोलिस निरीक्षकाची गोळ्या घालुन हत्या केल्यामुळे पोलिसातील अंतर्गत असलेला वाद चवाटयावर आला.त्याला आता विविध कांगोरे फूटले होते. कोणी म्हणाले होते की अतिरिक्त दिवटीच्या आणि सुट्या मुळे पोलिस नेहमी तणाव खाली असतात. हे पूर्ण सत्य नाही पोलिस दिवटीवर असताना कधीच तणाव खाली नसतात. त्यांना आळी पाळी ने आराम करण्याची व्यवस्था प्रत्येक ठिकाणी असते. पोलिसांच्या गाडया ज्या जागी उभ्या असतात.त्यात तत्पुरती व्यवस्था असते.



पोलिसांच्या गाडया बिना उत्पन्न असल्या शिवाय त्याजागी उभ्या राहत नाही.त्यात त्याचे दोन फायदे असतात. त्या ठिकाणी उभे राहून ते एका पार्टीचे रक्षण करतात तर दुसऱ्या पार्टीची लूट.पोलिसांना दोनी कडून हप्ते मिळतात.ते पाहण्यास तुम्हाला कर्णाक बंदर ते शिवडी बीपीटी रोड वर आणि मुंबई च्या अनेक चौकात जावे लागेल.पोलिसाची गाडी उभी असताना ठराविक ठिकाणी मालवाहतुक करणाऱ्या गाड्या तुन माल लुटल्या जातो. मालवाहतुक करणाऱ्या चालकानी पोलिसात तक्रार केल्यास पोलिस त्यालाच दम देतात तुमच्या मालाची काळजी तुम्ही घ्यावी त्यासाठी आमची दिवटी नाही.मग पोलिस गाडी चौकात उभी कसा साठी असते. म्हणूनच लिहतो पोलिसावर्दीतील माणुसकी जागवा माणुसकी वाचवा.

मुंबईतील रेल्वे स्टेशन जवळचे रोड पहा.फेरीवाले बेस्ट,रिक्षा फिरण्यास जागा ठेवत नाही. त्यांची तक्रार पोलिसाकडे केल्यास ते म्हणतात ते आमचे काम नाही. जास्त वाद घेतल्यास गाडीत बसा चला पोलिस स्टेशनला लेखी तक्रार करा. मग सुरु होते तुम्ही कोण ? कुठे काम करता?. कुठे रहता ?. कोणत्या पक्षाचे काम करता ?. तुम्हालाच काय त्रास होतो?. हजारो लोक जातात,येतात दिसते ना तुम्हाला ?. असा अनुभव पोलीसा कडून नेहमीच येतो. असे का होते?. पोलिस हा जनतेच्या रक्षणा करीता असतो?. जनतेची सेवा करतो ?. मग ते असे का वागतात. का त्याच्यातील माणूस जागा होत नाही.कारण....?

पोलिस भर्ती होतानाच त्यांना शारीरिक बौद्धिक गुणवंते बरोबर वशिला आणि पैसा लागतो. पहिल्या दिवसा पासुन जनतेची सेवा करण्या करीता सर्व रोडवर धंदा करणाऱ्याची यादी,सर्व प्रकारची धंदा करणाऱ्याची यादी,समाज सेवक,राजकीय कार्यकर्ते,नेते,एजेंट,दलाल यांची यादी, प्रसिद्ध गुन्हेगार यांची माहिती त्यांच्या पासुन कसे सावध राहवे यांचे घटना बाह्य नियम यांचे प्रशिक्षण पोलिसांना असते.यातून कोण्या अधिकाऱ्याला किती वाटा जातो,मिळतो.यांची डायरी प्रत्येक अधिकारी,पत्रकार, राजकीय कार्यकर्ते नेत्याकडे असते.पोलिस कोणाचे मित्र नसतात तर कोणाचे शत्रू ही नसतात.पण पैसा हा सर्वांचा जवळच मित्र असतो.

पोलिस कोणाशी प्रेमाने वागतात?.त्यांचे त्याच्या पोलिस असलेल्या माणसा बरोबर का जमत नाही त्यांचे या मागे हा इतिहास आहे.प्रत्येक पोलिस स्टेशन मध्ये एका देवाधिकाचे मंदिर हे असतेच पोलिस हे भारतीय राज्यघटने च्या नुसार धर्मनिरपेक्ष, निपक्ष,निर्भीड पणे काम करणारी सर्वत महत्वाची यंत्रणा आहे.तीच संविधानातील कायदा कलमा पेक्षा धर्म आणि जातीच्या अलिखित कलमा नुसार आचरण करीत असेल तर प्रत्येक पोलीसाची जात महत्वाची ठरते.जोशी विरोधी शिर्के, शिर्के विरोधी कांबले असे एक नाही हजारो उदहारण पोलिस दलात आहेत.पोलिस हा प्रथम धर्मनिरपेक्ष असला पाहिजे तरच त्यातील माणूस जागा होईल. पोलिसाच्या वर्दीतील माणुसकी जागवा माणुसकी वाचवता येईल. पोलिसातील माणूस जागा झाला तर त्याच्या विभागातील घटना बाह्य अनेक धंदे बंद होतील. महिलांचे,शाळाकॉलेजच्या मुलीचे जे लैंगिक शोषण करण्याची कोणी हिंमत करणार नाही.त्याचा फायदा सर्वच समाजाला होऊ शकतो.पोलिसातील माणूस जागा झाला तर देशातील भ्रष्टाचार,सर्व प्रकारची गुन्हेगारी नख्खीच कमी होईल.मानवातील माणूस जागा झाला पाहिजे.तसीच पोलिसाच्या वर्दीतील माणुसकी जागवा माणुसकी वाचवा.





***********

सागर रामभाऊ तायडे-
९९२०४०३८५९,
भांडुप,मुंबई.

# सरकारची माघार

केंद्र सरकारने नोकरशाहीत काही जागांवर थेट भरती करण्याचा निर्णय घेतला होता. विरोधी पक्षांच्या विरोधामुळे त्यांना 'लॅटरल एन्ट्री'चा हा निर्णय मागे घ्यावा लागला. याच मुद्द्यावरून काँग्रेस पक्षाने शाब्दिक हल्लाबोल सुरूच ठेवला आहे. त्यांच्या सरकारवरील टीकेचा सार असा आहे की, स्वत:ला तिसर्यांदा विजयी समजणार्या भारतीय जनता पार्टीला आता खर्या अर्थाने जनादेशाचा अर्थ समजला असावा. हा जनादेश पूर्णपणे भाजपच्या बाजूने नाही. त्यामुळे भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारला गेल्या दहा वर्षांतील सवय सोडावी लागणार आहे. त्यांना निर्णय लादता येणार नाही, तर अगोदर किमान त्यांच्या सहकारी पक्षांशीही त्याबाबत पूर्व चर्चा करावी लागेल.

काँग्रेसच्या म्हणण्यानुसार, अवघ्या दोन महिन्यांत सरकारला चार वेळा माघार घ्यावी लागली आहे. म्हटले तर हे लोकशाहीच्या दृष्टीने चांगलेच आहे. त्याचे कारण सरकारने आपलेच म्हणणे पुढे रेटणे आणि अन्य पक्षांची पत्रास न ठेवणे हे अनियंत्रितपणाचे लक्षण असते. तसे सरकारला आता करता येत नसून या माघारीतून त्यांनीही बोध घ्यायला हवा. वास्तविक प्रशासनात अनुभवी किंवा एखाद्या विषयातील तज्ज्ञांची सेवा घेणे नवीन नाही. पंडित नेहरूंपासूनच ती परंपरा सुरू आहे व त्यामुळेच देश आज इथपर्यंत मजल मारू शकला. नेहरू यांच्या नंतरच्या सरकारांनाही या परंपरेचे वावडे नव्हते. अनेक उच्च पदांवर अशा तज्ज्ञांना थेटपणे आणले गेले. डॉ. मनमोहन सिंग आणि माँटेकसिंग अहलुवालीया ही याची ठळक आणि सन्माननीय उदाहरणे. तसेच ४५ जागांवर आता सरकारला करायचे होते. मात्र, त्यांना माघार घ्यावी लागली याचा अर्थ स्पष्ट आहे की सरकारवर दबाव होता. हा दबाव केवळ विरोधी पक्षांचाच नव्हता, तर मित्रपक्षांचाही होता.


सरकारच्या स्थैर्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या तेलगु देसम पक्षाचे चंद्राबाबू नायडू यांचे खरेतर 'लॅटरल एन्ट्री'ला समर्थनच होते. सरकारने अनुभवी तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी, असे त्यांचे मानणे आहे व नायडू यांचा एकूण पिंड पाहता ते हीच भूमिका घेतील हे अपेक्षितच होते. चिराग पासवान आणि संयुक्त जनता दलाने मात्र जाहीर विरोध केला. त्यातून एक स्पष्ट झाले की, मोदी सरकारने हा निर्णय घेण्यापूर्वी मित्रपक्षांशीही चर्चा केली नव्हती. तसे त्यांनी केले असते तर नंतर माघारीचे पाऊल त्यांना उचलावे लागले नसते. रणनीतीच्या दृष्टिकोनातून ही सरकारची चूकच झाली व भविष्यात त्यांना यात सुधारणा करावी लागेल. सरकारने आणखी एका गोष्टीचे स्मरण ठेवणे आवश्यक आहे की गेल्या दहा वर्षांत त्यांना टोकणारे कोणीच नव्हते. कारण त्यांना कोणाच्या टेकूची गरजच नव्हती. त्यामुळे जो निर्णय होत होता तो कथित सहमतीनेच झाला, असे मानण्याचा पायंडा पडला होता. त्यात लोकसभा निवडणुकीच्या रणधुमाळीपासून मोठा बदल झाला आहे.


देशाचे एकूणच राजकारण नकारात्मक वळणावर गेले आहे. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाची जी हाकाटी दिली गेली त्या ठिकाणीच आता सगळे मुद्दे नेऊन थांबवले जात आहेत. 'लॅटरल एन्ट्री'च्या बाबतीतही तसे जाणीवपूर्वक केले गेले आणि या बाबतीत आपण असे करणे आवश्यक होते का याचा विरोधकांनीही विचार करणे आवश्यक. तथापि, दोन महिन्यांत सरकारला चार वेळा माघार घ्यायला लावली या आनंदातच जर विरोधी पक्षांना राहायचे असेल तर त्यांना ते लखलाभ. भारताचा गाडा अशाने पुढे जाणार नाही. सरकारला थेट भरती करून एससी-एसटींचे आरक्षण हिरावून घ्यायचे असल्याचा विरोधी पक्षांचा प्रमुख आक्षेप होता. थेट भरती केली म्हणजे नियमितपणे भरती झालेल्या लोकांच्या योग्यतेवर अविश्वास दाखवण्यासारखे आहे, असे चित्रही जाणीवपूर्वक उभे करण्याची आवश्यकता नव्हती.

मंत्रालयांचे कामकाज अर्थात एकूणच सरकार नोकरशाहीच्या भरवशावरच चालत असते. त्यात विभिन्न पार्श्वभूमीचे लोक असतात. काहींकडे तांत्रिक कौशल्यही असते, सगळ्यांकडे ते नसते. काही वेळा अधिकार्यांना कौशल्य सुधारणेसाठी परदेशातही पाठवले जाते. हे सगळे होत असताना अचानक मोठ्या प्रमाणावर बाहेरून थेट माणसे आणून बसवल्यामुळे गदारोळ माजणे स्वाभाविक होते. थेट भरतीला विरोधाचे दुसरे कारण असेही सांगितले गेले की हे लोक सरकारच्या मर्जीने आणले गेलेले असतात त्यामुळे ते सरकार धार्जिणीच भूमिका घेतात. त्यांच्या अगोदर त्या खात्यात आपल्या गुणवत्तेवर दाखल झालेल्यांच्या प्रगतीची दारे त्यांच्यामुळे संकुचित होतात. हा मुद्दाही रास्त आहे, मात्र जेव्हा आपल्याला बदलत्या जगाची गरज म्हणून काही गोष्टी वेगळ्या प्रकारे कराव्या लागणार असतील आणि त्याकरता ठराविक पठडीच्या बाहेर जाऊन विचार करणार्या तज्ज्ञांची आवश्यकता भासत असेल, तर त्यालाही आडकाठी असता कामा नये.

अनेक सन्मानीय व्यक्तींनी असामान्य संकटातून देशाला बाहेर काढले आहे ते याच तज्ज्ञांच्या असामान्य बुद्धिमत्तेमुळे आणि त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे. आपण काही किंवा सर्वच बाबींची राजकारणाशीच सांगड घालण्याचा नकारात्मक पवित्रा सातत्याने स्वीकारला, तर तो देशाच्या हिताचा असणार नाही. नियमित प्रशासकीय अधिकारी आणि त्यांच्या पात्रतेचा व योग्यतेचा आदर आहेच, पण आपणच सर्वज्ञ असल्याचे जेव्हा वाटू लागते तेव्हा प्रगतीला फार मर्यादित वाव राहतो. तो अंतत: कोणाच्या हिताचा नसतो. सरकारच्या माघारीचा आनंद मानत असताना याचाही विचार जरूर व्हावा की भविष्यात आपण सत्तेवर आल्यावर जर आपल्यालाही भविष्याचा विचार करून काही वेगळे मार्ग चोखाळावे लागले, तर आपली आजची भूमिका त्यावेळी आपल्याला अवघडलेपण आणणार तर नाही ना?

# चेहऱ्यावर नैसर्गिक चमक आणण्यासाठी 'या' पद्धतीने करा केशरचा वापर, त्वचेवर येईल इन्स्टंट ग्लो





भारतीय मसाल्यांमध्ये किंमतीने महाग असलेले केशर गोड पदार्थ बनवण्यासाठी किंवा सजावटीसाठी वापरले जाते. केशरचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. केशरच्या काड्यांची किंमत जरी महाग असली तरीसुद्धा अनेक लोक केशरचा रोजच्या आहारात वापर करतात. यामुळे सर्दी, खोकला आणि पोटासंबंधित समस्यांपासून आराम मिळतो. केशरमध्ये मँगनीज मुबलक प्रमाणात आढळून येते, ज्यामुळे केस आणि त्वचेला फायदा होतो. केशरचे सेवन केल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते, पचनक्रिया सुधारते, झोपेची गुणवत्ता सुधारते इत्यादी गोष्टींचा फायदा होतो. त्वचेवर केशर लावल्याने त्वचेचा रंग आणि पोत सुधारण्यास मदत होते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला केशरचा वापर करून फेसपॅक कसा बनवायचा, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

त्वचेला केशर लावण्याचे फायदे: केशरमध्ये सोडियम, पोटॅशियम, डाएटरी फायबर, विटामिन सी, कॅल्शियम, लोह, विटामिन डी, विटामिन बी६, कोबालामिन, मॅग्नेशियम इत्यादींचा अनेक घटक आढळून येतात, जे त्वचा आणि केसांसाठी गुणकारी आहेत. उन्हामुळे काळा पडलेले त्वचेचा रंग सुधारण्यासाठी सकाळी उठल्यानंतर नियमित केशराचे पाणी प्यावे. हे पाणी त्वचेमधील काळेपणा दूर करून त्वचेचा रंग सुधारण्यासाठी मदत करते. केशर त्वचेला पोषण देते. त्यामुळे तुम्ही केशरपासून तयार केलेले फेस प्रॉडक्ट वापरू शकता. आठवड्यातून एकदा किंवा दोनदा केसर फेसपॅक चेहऱ्यावर लावल्यामुळे त्वचा उजळून चेहऱ्यावर नैसर्गिक ग्लो येतो.चंदन पावडर आणि केशर: फेसपॅक बनवण्यासाठी एका वाटीमध्ये १ चमचा चंदन पावडर घेऊन त्यात ३ ते ४ काड्या केशर टाकून त्यात दूध टाका. हे मिश्रण व्यवस्थित मिक्स करून झाल्यानंतर संपूर्ण चेहऱ्याला लावा. यामुळे तुमच्या त्वचेचा रंग सुधारेल. फेसपॅक चेहऱ्याला लावून झाल्यानंतर हलक्या हाताने त्वचेवर मसाज करा. त्यानंतर २० मिनिटं फेसपॅक सुकण्यासाठी ठेवून घ्या. चेहरा पूर्णपणे कोरडा झाल्यानंतर पाण्याने स्वच्छ धुवा. केशर आणि दूध: त्वचेवर नैसर्गिक चमक आणण्यासाठी एका वाटीमध्ये दूध घेऊन त्यात केशरच्या काड्या ४ तासांसाठी भिजत ठेवा. केशर व्यवस्थित भिजल्यानंतर दुधाचे मिश्रण मान आणि त्वचेला लावा. त्यानंतर चेहरा कोरडा होण्यासाठी ठेवा. थंड पाण्याने चेहरा धुतल्यानंतर तुम्हाला काही प्रमाणात फरक दिसून येईल. हा उपाय आठवड्यतून दोनदा केल्यामुळे त्वचा चमकदार आणि चेहऱ्यावर इन्स्टंट ग्लो येईल.

त्वचेला केशर लावण्याचे फायदे त्वचेला केशर लावण्याचे फायदे तुळस आणि केशर:
केशर आणि तुळशीचा वापर केल्यामुळे चेहऱ्यावरील मुरूमं, डाग, पिंपल्स आणि ब्लॅकहेड्स निघून जाण्यास मदत होईल.
एका वाटीमध्ये तुळशीची पाने आणि केशरच्या काड्या एकत्र करून पेस्ट तयार करा.
तयार पेस्ट संपूर्ण चेहऱ्याला आणि मानेला लावा. १५ ते २० मिनिटं ठेवल्यानंतर चेहरा स्वच्छ धुवून घ्या.
यामुळे फोड किंवा पिंपल्सचे डाग निघून जाऊन चेहरा स्वच्छ होईल.

# जेवणाची मजा वाढवा! घरी बनवा ढाबा स्टाइल झणझणीत मिरची फ्राय, वाचा रेसिपी

आपण भारतीय झणझणीत पदार्थांसाठी जगभर ओळखले जातो. आपण जितके तिखट पदार्थ खाऊ शकतो तितके तिखट पदार्थ इतर कोणत्याही देशातले लोक खाऊ शकत नाही. आपल्याकडे ताट वाढताना उजव्या बाजूला जितके महत्त्व असते तितकेच महत्त्व डाव्या बाजूलाही असते. वेगवेगळ्या प्रकारच्या कोशिंबिरी, चटणी, लोणचं, पापड, भजी असे सर्व प्रकार ताटाच्या डाव्या बाजूला ठेवण्याची आपल्यात प्रथा आहे. महाराष्ट्रात बहुतेकदा नेहमीच्या जेवणात दाण्याची, लसणाची, तिळाची, खोबऱ्याची, जवसाची चटणी, मिरचीचा खर्डा असे जेवणाची रंगत वाढवणारे काही तिखटाचे पदार्थ आधीच बनवून ठेवले जातात. याच गोष्टीची दखल घेत आज आम्ही तुमच्यासाठी एक खास आणि झणझणीत रेसिपी घेऊन आलो आहोत. आज आम्ही तुम्हाला ढाबा स्टाइल मिरची फ्राय कशी बनवायची याची एक सोपी रेसिपी सांगत आहोत. जाणून घ्या यासाठी लागणारे साहित्य आणि कृती. साहित्य ७-८ मोठ्या आकाराच्या मिरच्या २-३ हिरवी मिर्च १ सर्व्हिंग स्पून मोहरीचे तेल चिमूटभर हिंग २ चम्मच,पंच मसाला घाला (आजवाईन, जिरे, कलोंजी, मेथी, सौफ आणि मोहरी) १/२ हळद १/२ चम्मच धनेपूड मीठ कृती ढाबा स्टाइल मिरची फ्राय बनवण्यासाठी सर्वप्रथम मोठ्या आकाराच्या मिरच्या घ्या आणि पाण्याने या मिरच्या छान स्वछ धुवून घ्या मिरच्या धुवून झाल्यांनतर त्यांचे दोन भाग करा आणि त्यांच्या मधोमध चाकूच्या मदतीने चीर पाडा यानंतर गॅसवर एक कढई ठेवा आणि त्यात एक चमचे मोहरीचे तेल टाका नंतर यात चिमूटभर हिंग आणि पचं मसाला घाला (आजवाईन, जिरे, कलोंजी, मेथी, सौफ आणि मोहरी) घाला आणि मिक्स करा मसाला नीट परतल्यानंतर यात मिरच्या, हळद, धणेपूड आणि चवीनुसार मीठ टाका आणि सर्व साहित्य छान एकजीव करून घ्या मग यात एक चमचा कोणतेही लोणचे घाला आणि चांगले मिक्स करा आता कढईवर झाकण ठेवा आणि मध्यम आचेवर ही मिरची तीन ते चार मिनिटे चांगली शिजवून घ्या अशाप्रकारे तुमची ढाबा स्टाइल झणझणीत मिरची फ्राय तयार होईल गरमा गरम जेवणासोबत हिला खाण्यासाठी सर्व्ह करा





# मुख्यमंत्री वयोश्री योजनेमुळे ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखकर बनण्यास होणार मदत

मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्यासाठी राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे.
ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

असे आहे योजनेचे स्वरूप

ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल. या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनःस्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकषज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील. ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.
लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे. अर्जदारांने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.
पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.
अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.
योजनेची अंमलबजावणी लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे. तसेच लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.
६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत.

लातूर जिल्ह्यात आतापर्यंत ३२ हजार अर्ज प्राप्त

मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज स्विकारण्याची कार्यवाही लातूर जिल्ह्यात सुरू आहे. या अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातून आतापर्यंत सुमारे ३२ हजार ६३ अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यासाठी ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी यांनी ज्येष्ठ नागरिकांना माहिती देवून अर्ज भरण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहे.

**-जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**



लातूर येथील महात्मा बसवेश्वर महविद्यालयाला भेट दिली असता, या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी एक सामाजिक, शैक्षणिक ,सांस्कृतिक ,धार्मिक अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करत असल्याने एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून व महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे केंद्रीय सहसचिव म्हणून,संस्थेचे सचिव सहसचिव तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. संजय गवई सर यांच्या हस्ते यु.डी. गायकवाड यांचा यथोचित सत्कार केला. या प्रसंगी प्रा.सुभाष भिंगे सर, प्रा. हर्षवर्धन कोल्हापुरे सर ,नर्सिंग घोडके सर, इंजिनिअर श्रीधर शेवाळे, रामराजे आत्राम साहेब ,प्रा. गोडबोले सर ,प्रा.शिवशरण हावळे सर व इतर प्राध्यापक उपस्थित होते.

# जिल्हा प्रशासन, मनपा, पोलिस दल व लोकप्रतिनिधींना नांदेडकरांचा सॅल्यूट!

नांदेड : विशेष प्रतिनिधी शुक्रवारी रात्री पडलेल्या मुसळधार पावसामुळे शिवपुराण कथास्थळाला तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले होते. सर्व ठिकाणी पाणीच पाणी झाल्याने मंडपात मुक्कामी असलेल्या भाविकांची तारांबळ उडाली. जमा झालेले पाणी कसे काढावे यासाठी भाविकांना प्रश्न पडला होता. आता आपले कसे होईल, आपले वास्तव्य कुठे होईल, रात्री अशीच काढावी लागेल का, अशा अनेक प्रश्नांनी भाविकांना भंडावून सोडले होते. यावेळी मात्र जिल्हा प्रशासन, महापालिका, पोलिस दल व लोकप्रतिनिधी धाऊन आले आणि सर्वच समस्या निकाली लागल्यामुळे भाविकांमध्ये आनंदाचे अश्रू आले. त्यामुळे असेच म्हणावेसे वाटते, या सर्व योद्ध्यांना नांदेडकरांचा सॅल्युट! शुक्रवारची रात्र नांदेडकरांसाठी वै-याची रात्र होती. अचानकपणे ढगफुटी झाल्यामुळे २५ ते ३० हजार भाविकांची व्यवस्था कशी करावी? हा प्रश्न जिल्हा प्रशासनासह नांदेडकरांना पडला होता. वा-यासारखी बातमी पसरताच संपूर्ण नांदेड शहर मदतीसाठी धावून आले. बजरंग दल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विविध पक्षाचे कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, व्यापारी, स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते कौठा परिसरात धाव घेतली. प्रत्येक जण मदतीचा हात देत होता. दरम्यान कथा मंडपात मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने मडपाची परिस्थिती बिकट झाली होती. भाविकांना तेथे थांबणे शक्य नसल्याने त्यांना अन्य ठिकाणी हलविणे आवश्यक होते. यावेळी जिल्हा प्रशासन, महापालिका, पोलीस दलाने धाव घेतली.पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी संबंधितांना योग्य त्या सूचना केल्या.

# द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडिया, पुणे यांच्याकडून बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड पारितोषीक विलास सहकारी साखर कारखाना युनिट - २ ला प्रदान

## माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि मांजरा परीवारातील व्यवस्थानपनाचे कौतुक

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि मांजरा परीवारातील व्यवस्थानपनाचे कौतुक
राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विलास साखर कारखान्याची उभारणी आणि यशस्वी वाटचाल सुरू आहे. लातूर जिल्हयातील उदगीर येथील बंद असलेला हा कारखाना अवसायानात निघालेला होता. तेथील शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा प्रश्न निर्माण झाला होता. तेथील सभासद, शेतकरी यांच्या मागणीची दखल घेऊन तो कारखाना घेऊन विलास कारखाना मार्फम सहकारी तत्वावर चालविण्याचा निर्णय घेतला. कारखाना चांगला चालण्यासाठी त्यात तांत्रीक बदल करण्यात आले, अंतर्गत आधुनीकीकरण, विस्तीरीकरण करुन पुर्नजीवीत करण्यात आला. तेथे सर्वच गळीत हंगामात ऊसाचे विक्रमी गाळप केले, चांगल्या दर्जाच्या साखरेचे उत्पादन केले, चांगला साखर उतारा मिळवीण्याचे काम केले. येथील ऊसाला मराठवाडा विदर्भ विभागात सर्वांधीत ऊसदर देण्याचे काम केले. या यशस्वी कामगीरी बददल राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे या प्रसंगी सर्वांनी कौतुक केले.




लातूर / प्रतिनिधी : - द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाने २०२४ वर्षातील प्रतिष्ठित बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड हा पुरस्कार विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना युनिट - २, तोंडार, उदगीर येथील कारखान्यास प्रदान केला, हा सहकार आणि साखर उदयोगातील मानाचा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यकारी संचालक यांनी डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या कार्यक्रमात पुणे येथे स्विकारला. द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाचे गळीत हंगाम २०२३-२४ साठीच मानाच राज्यस्तरीय बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड पारीतोषिकासाठी विलास सहकारी साखर कारखान्यानी केलेल्या कामगिरीचे मुल्यमापन करूनच या पारीतोषिकासाठी निवड करण्यात आली होती. सदरील पारीतोषीक शनिवार दि. २४ ऑगष्ट २४ रोजी पुणे येथील सभागृह, जे. डब्ल्यू. मॅरियट सेनापती बापट रोड येथे डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन सत्रादरम्यान माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राज्यातील मान्यवरांच्या हस्ते स्विकारण्यात आले. कारखान्याच्या वतीने हा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावदेशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, अनंत बारबोले, नारायण पाटील, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रंजित पाटील, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, गोविंद डुरे, अमृत जाधव, भारत आदमाने, रामदास राऊत, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर, कल्याण पाटील, ग्यानोबा गोडभरले, पंडीत ढगे, विनोबा पाटील, संदिप पाटील, मन्मथअप्पा किडे, संतोष तिडके, मारोती पांडे, कारखान्याचे अधिकारी अजय कोळगे, देविदास मोकाशे, सुनिलकुमार चापूले, राजेसाहेब खोसे, तानाजी गुमनार, किशन चौधरी, संदिप शिंदे आदीनी स्विकारला. आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचे मार्गदर्शन, माजी मंत्री, आमदार, संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख साहेब, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. विलास सहकारी साखर कारखान्याने झालेल्या गळीत हंगामात कार्यक्षमतेचा केलेला वापर, पाण्याची बचत व पूर्नवापर, इंधन व ऊर्जेत बचत, साखर उताऱ्यात वाढ, ऊसतोडणी, वाहतुक यंत्रणेचा कार्यक्षम वापर, तांत्रीक कार्यक्षमता, ऊसविकास योजना, मनुष्बळ विकास उपक्रम, ऊस गाळप, साखरेचा दर्जासह यावेळी या सर्व कामाचे द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए), पुणे व उपस्थित सर्व मान्यवरांनी कारखाना वाटचाली बददल व्यवस्थापन आणि प्रशासनाचे कौतुक केले. या पारितोषिकाने विलास कारखान्यास गौरविण्यात आले, याबददल माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांनी कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, आधिकारी, कर्मचारी वर्ग, वाहतूक ठेकेदार, तोडणी मंजूर व कंत्राटदार या सर्वाचे व्यवस्थापनाचे वतीने अभिनंदन केले.

# नंदीग्रामसह जलद रेल्वेंना एसी चेअरकार कोच जोडा

## दिवसाच्या प्रवासासाठी प्रवाशांना सहन करावा लागतो आर्थिक भुर्दंड

नंदीग्राम एक्स्प्रेसचा तत्काळ कोटा वाढवा :पूर्वी थर्ड एसी तत्काळचा कोटा ३० होता. आता तो १७ वर आला आहे. टू टायर एसीचा कोटा ८ होता, तो आता २ वर आला आहे. एच वनचा कोटा गायब झाला आहे. मुंबईचे तिकीट काढायचे झाल्यास वेटिंगच दाखवते. त्या उलट मुंबईवरून येणाऱ्यास एचए- वनचे तिकीट मिळते.

कृष्णा एक्स्प्रेसला टू एसी व फर्स्ट एसी कोच हवा :आदिलाबाद ते तिरुपती कृष्णा एक्स्प्रेसला केवळ थर्ड एसी कोच आहेत. एचए-वन व सेकंड एसी कोच नाहीत. तिरुपती येथे फस्ट क्लास व सेकंड एसीने प्रवास करणारे प्रवासी अधिक आहेत. एचए कोच बसवला तर त्यात सेकंड एसीने प्रवास करणे प्रवाशांना सोयीचे होईल. या सर्व मागण्यांकडे दक्षिण मध्य रेल्वेने लक्ष देण्याची मागणी किनवटकरांनी केली आहे.



किनवट/शेख शौकत :-नंदीग्राम एक्स्प्रेसने किनवटहून छत्रपती संभाजीनगर येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. झोपून न जाता बसूनच जावे लागते. वातानुकूलित, स्लीपरच्या बाबतीतही तीच परिस्थिती आहे. या प्रवासाने पन्नास टक्के भुर्दड प्रवाशांना सोसावा लागत आहे. त्यामुळे नंदीग्राम एक्स्प्रेसला चेअर कार कोच बसवण्यात यावा, अशी मागणी प्रवासी करत आहेत. किनवटमार्गे नांदेड- दिल्ली, दुपारच्या वेळी नांदेड नागपूर इंटरसिटी, आदिलाबाद ते हैदराबाद इंटरसिटी, आदिलाबाद ते शिर्डी ह्या नव्याने गाड्या सुरू करण्याची मागणी होत आहे. आदिलाबाद ते नांदेड या लोहमार्गावर रेल्वेविषयक अनेक मागण्या प्रलंबित असताना आता नव्या मागण्या प्रवाशांकडून करण्यात येत आहेत.

किनवट ते छत्रपती संभाजीनगर थर्ड एसीचे तिकीट ७५० रुपये आहे. थर्ड एसीचे रिझर्व्हेशन केले तरी झोपून न जाता बसूनच जावे लागते. बलाहरशाह ते मुंबई या नंदीग्राम एक्स्प्रेसला चेअर कार कोच बसवण्यात आला तर साधारणपणे तीनशे ते साडेतीन रुपये मोजावे लागतील. आज मात्र ७५० रुपये मोजावे लागत असल्याने ३०० रुपयांचा नाहक भुर्दंड सोसावा लागतो. स्लीपरलाही सेकंड सिटिंग बसवले, तर ३५० रुपयांऐवजी १५० रुपयांत छत्रपती संभाजीनगरला जाता येईल. आदिलाबाद शिर्डी रेल्वे सुरू झाली, तर शिर्डी येथे दर्शनासाठी जाणे भाविकांना सोयीचे होईल.

# जन समस्या निवारण शिबिर संपन्न




नवी मुंबई / प्रतिनिधी :- जुईनगर येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह ठिकाणी शुक्रवार दि.२३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ७ वा. विभागातील समस्या सोडवण्यासाठी विजय नाहटा शिवसेना उपनेते आले होते,जुईनगर मधील सोसायटीच्या पदाधिकारी यांनी सहभाग घेऊन आपले निवेदन देऊन पाणी, गटार,आरोग्य इत्यादी अनेक समस्या मांडून त्यावर योग्य मार्गदर्शन करून विजय नाहटा यांनी निवारण करून देण्याचे आश्वासन दिले,कार्यक्रमाला शहरप्रमुख विजय माने,उपजिल्हाप्रमुख मिलिंद सूर्यराव, उपजिल्हाप्रमुख दिलीप घोडेकर, प्रदीप वाघमारे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. जुईनगर शिवसेना शाखेचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशहरप्रमुख सिध्दार्थ साळवी यांनी केले.

# लोकनेते स्व विलासराव देशमुख यांच्या स्मृती दिनानिमित्त ११ ऑगस्ट रोजी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शिवरत्न पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा सन्मान सोहळा !!



सौ.मायाताई पाटील सरपंच | डॉ.पंजाब खानसोळे उपायुक्त | जगदिश कोकाटे विभागीय अभियंता | हनुमंत नागटिळक सामाजिक | महेश हिप्परगे मंडळ अधिकारी | ह.भ.प.सुनिल जवळे सांप्रदायिक | अशोक हानवते संपादक | राजन सरवदे कलाक्षेत्र | गोविंद महाके ग्रामसेवक | विजयकुमार कावळे शैक्षणिक क्षेत्र | संगिता बरूरे सखी महिला बचत गट

लातूर /प्रतिनिधी :- लातूर मिशन वृत्तपत्राचा आकरावा वर्धापन दिन व शिवदर्शन फांऊडेशन लातूर यांच्या संयुक्त विद्यामाने लोकनेते स्व. विलासरावजी देशमुख साहेब यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून दरवर्षी प्रशासनासह वेगवेगळया क्षेत्रातील यशस्वी व उल्लेखनीय कार्य करणार्या व्यक्तींना मानाचा शिवरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात येत असते. दर वर्षी लातूर मिशन वृत्तपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त हा आगळावेगळा उपक्रम राबविला जातो. लोकनेते स्व. विलासरावजी देशमुख साहेब यांच्या कार्यावर उजाळा देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न या निमित्ताने केला जातो. आत्तापर्यंत ८९ कर्तृत्ववान व्यक्तींना शिवरत्न पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. वृत्तपत्राने वेळोवेळी रोखठोक व निर्भीड भूमिका घेऊन राजकीय, प्रशासकीय व सामाजिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम गेल्या ११ वर्षापासून अविरतपणे केले आहे. तसेच सामाजिक कार्यात सुद्धा वृत्तपत्राच्या माध्यमातून एक वेगळी छाप वाचकांच्या व सर्वसामान्यांच्या मनावर बिंबवली आहे. या वर्षी आकरावा महोत्सव असल्याने शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. यावर्षीचा २०२४ शिवरत्न पुरस्काराचे मानकरी खालीलप्रमाणे आहेत. सौ. मायाताई पाटील सरपंच ग्रामपंचायत नांदगाव, डॉ. पंजाब खानसोळे उपायुक्त मनपा लातूर, जगदिश कोकाटे विभागीय अभियंता रा.प.महामंडळ लातूर, हनुमंत बापू नागटिळक सामाजिक कार्य तथा उपसरपंच ग्रामपंचायत मुरूड, महेश हिप्परगे मंडळ अधिकारी कासारखेडा ता.जि.लातूर, ह.भ.प. सुनिल महाराज जवळे सांप्रदायिक क्षेत्र, अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त, राजन सरवदे गीतकार संगितकार कलाक्षेत्र, गोविंद महाके ग्रामसेवक ग्रामपंचायत शामनगर १२ नं. पाटी लातूर, विजयकुमार कावळे शैक्षणिक क्षेत्र जिजाऊ इंग्लीश स्कुल चिंचोली (ब.) ता.जि. लातूर, सौ. संगिता बरूरे अध्यक्ष सखी महिला बचत गट, लातूर या मान्यवरांना या वर्षीचा शिवरत्न पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमात लातूर मिशन वृत्तपत्र व शिवदर्शन फांऊडेशन यांच्या वतीने अनाथ व गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणार्या शिवरत्न पुरस्कार प्राप्त व्यक्तींच्या पाठिवर कौतुकाची थाप देण्यासाठी या पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळयाला आपण दि. २९ ऑगस्ट २०२४ वार गुरूवार रोजी सकाळी १०.३० वा. स्थळ : डॉ. भालचंद्र ब्लड बँक, बसस्टँड पाठीमागे, लातूर येथे उपस्थित राहावे, असे आवाहन भारत जाधव मुख्य संपादक लातूर मिशन वृत्तपत्र तथा अध्यक्ष शिवदर्शन फाऊंडेशन लातूर, उपसंपादक परमेश्वर घुटे, कार्यकारी संपादक सुरेश काचबावार, सल्लागार - कैलास साळुंके, श्रीराम गायकवाड, गोविंद जगताप, गणेश स्वामी, ऍड. नामदेव शिंदे, दयानंद माने, शंकर जाधव, अमित तिकटे, कैलास ढोले, श्रीमंत होळे, विष्णु शिंदे, महेश राठोड, सादिक शेख, प्रा.विनोद चव्हाण, मनोज चव्हाण, प्रा. बालाजी वाघमारे, कुमार भालेराव, उमेश भिसे, केदार वांगसकर, महालिंग तटाळे, ज्ञानेश्वर सुर्यवंशी, दिपक बोराडे पाटील, तुकाराम जोगदंड, सोपान जाधव, अजित दुटाळ, बालाजी कांबळे, प्रदिप शिंदे, उमाकांत माळी, अनिल शेळके, दिपक शिंदे, शुभम चव्हाण, ओमकार सरडे, संतोष मगर, मंगेश आडे, दयानंद स्वामी, सुरज मगर, गणेश भोसले, ईश्वर पानढवळे, लाला बोराडे, अर्जुन लोखंडे, परमेश्वर माचवे, अमर जाधव, गोविंद सावंत, दयानंद लकडे, आदित्य जाधव, प्रकाश चिंताले, लखन सावंत, शिवाजी कोरडे, ऋषिकेश मोरे, संपत भिसे आदींनी केले आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे संयोजक समितीचे आवाहन.

# पोलीस भरतीत निवड झालेल्या उमेदवारांना पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले नियुक्तीचे आदेश




लातूर :- पोलीस भरतीत निवड झालेल्या उमेदवारांना पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी दिले नियुक्तीचे आदेश याबाबत माहिती अशी की लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर एकूण ६४ पोलीस अमलदारांची भरती करिता दिनांक १९/०६/२०२४ पासून पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांचे मार्गदर्शनात अतिशय पारदर्शकपणे भरती प्रक्रिया राबविण्यात आली. सदर भरती प्रक्रियेत विविध परीक्षा व चाचण्यामध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवाराची मेरिट प्रमाणे लिस्ट लावून पोलीस भरती संदर्भातले मापदंड पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्रांची तपासणी पूर्ण झाल्याने दिनांक २३/०८/२०२४ रोजी एकूण ३० उमेदवारांना पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी पोलीस अंमलदार पदाचे नियुक्ती आदेश दिले.

पोलीस भरती सहभाग घेऊन उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना काही दिवसातच लातूर जिल्हा पोलीस दलात पोलीस अमलदर म्हणून नियुक्तीचे आदेश मिळाल्याने त्यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण होते. तसेच लवकरात लवकर नियुक्ती आदेश मिळाल्याने समाधान व्यक्त करून पोलीस दलाचे व महाराष्ट्र शासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

निवड झालेल्या एकूण ६४ उमेदवार पैकी ३० उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व इतर कागदपत्राची पडताळणी पूर्ण झाल्याने त्यांना नियुक्ती आदेश देण्यात आले असून उर्वरित ३४ उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य पडताळणी व कागदपत्रांची तपासणी होताच त्यांना पण लवकरात-लवकर नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत.

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडी कडून लातुरात आंदोलन,काळ्या पट्ट्या बांधून सरकारचा निषेध





लातुर प्रतिनिधी :- बदलापूर येथे झालेल्या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ तसेच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात महाविकास आघाडी च्या वतीने शनिवारी लातुर मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक या ठिकाणी काळ्या फिती बांधून आंदोलन करण्यात आले.यावेळी राज्यातील निष्क्रिय महायुती सरकार विरोधात मविआ कडून निषेध व्यक्त करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थिनींच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आंदोलनात प्रामुख्याने महिलेच्या सुरक्षेसाठी ठोस योजना आखावी, महिला अत्याचार गुन्ह्यातील नराधम आरोपींना कठोर व तात्काळ शासन व्हावे आशा मागण्या करीत आंदोलकांनी राज्य व केंद्र शासनाच्या विरोधात घोषणा देत निषेध नोंदवला. यावेळी महाविकास आघाडीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अँड.किरण जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय शेटे,शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लातूर प्रमुख सुनिल बसपुरे,अँड.उदय गवारे,महिला अध्यक्ष सौ स्मिताताई खानापुरे,विष्णुपंत साठे,रविशंकर जाधव,इम्रान सय्यद, प्रवीण सूर्यवंशी,गोविंद देशमुख,अनिल चव्हाण, अँड. देविदास बोरूळे पाटील,प्रा.प्रवीण कांबळे,अय्युब मणियार,पुनीत पाटील,आसिफ बागवान,तबरेज तांबोळी,शेख कलीम,प्रा.एम. पी.देशमुख,अँड.राहुल मातोळकर,शंकर रांजनकर, इब्राहिम शेख,अँड.शेखर हविले,इरांना पावले,प्रवीण साळुंके,मुन्नाभाऊ तळेकर, रघुनाथ मदने,जाकेर सय्यद,कल्पना फरकांडे,मनीषा कोकणे,चंद्रलेखाताई गोजमगुंडे ,आदित्य कांबळे, अजहर शेख,शताब्द शेख,तोसीब शेख,निशांत वाघमारे,उमाकांत डी,बागवान,नागरगोजे,बरकत शेख, यशपाल कांबळे,युसुफभाई बाटलीवाला,अजीज बागवान,अँड.अंगदराव गायकवाड,सुलेखा कारेपूरकर,शीतल मोरे,मीनाताई सूर्यवंशी,कमलताई मिटकरी,नागनाथ डोंगरे,हमीद बागवान,राम स्वामी, सुंदर पाटील कव्हेकर,नामदेव इगे,विजयकुमार धुमाळ,कवठेकर,ि सराजभाईशेख,फारूक शेख , पवनकुमार गायकवाड,पिराजी साठे,अस्लम शेख, अभिषेक पतंगे,अमोल गायकवाड,हरिभाऊ गायकवाड,खाजापाशा शेख,करीम तांबोळी,युनूस शेख,राहुल डुमने,संजय सुरवसे,लक्ष्मण सुरवसे, मैनुभाई शेख,काशिनाथ वाघमारे,किरण बनसोडे, आकाश मगर यांच्यासह सिके मुरळी,माधव कळमुकले,विष्णूपंत साठे,चव्हाण, राहुल मातोळकर,श्रद्धा जवळगेकर,शंकर रांजणकर,राजू कतारी,शिवराम मुळावर,प्रदिप उपासे, राहुल रोडे,राम चोथवे,दिलीप भांडेकर,समद शेख, एक्बाल बागवान,बाळू मोरे, गणेश गंगणे,भास्कर माने, प्रविण मगर,करण शिंदे,रवी संमुखराव,बाळू घोडके, संतोष घोडके,सुर्यवंशी सर यांच्यसह अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# स्वत: सोबत इतरांचा आदर करा प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई



लातूर :- आपल्याला निरोगी, सुदृढ, सक्षम आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर स्वतःसोबत इतरांचा आदर केला पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले. महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, समाजकार्य विभागातर्फे समाजकार्य पंधरवडा अंतर्गत शिव्या मुक्त अभियान या कार्यक्रमांतर्गत इतरांचा आदर.... महिलांचा सन्मान या विषयावरील समारोप समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रा. काशिनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. भाग्यश्री भुजबळ, आणि प्रा. प्रकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले. पुढे बोलताना प्राचार्य प्रभारी डॉ. गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी व्यावसायिक समाजकार्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून समुदाय शिव्यामुक्त झाल्याने समृद्ध आणि लोकशाही राष्ट्र निर्माण होईल. आपण एक उत्कृष्ट व्यावसायिक समाजकार्यकर्ता बनाल. महाराष्ट्रातील सर्व समाजकार्य महाविद्यालये आणि मास्वे संघटनेने समाजकार्य पंधरवड्याच्या माध्यमातून शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध १४ उपक्रमाची माहिती देऊन याद्वारे खऱ्या अर्थाने आपल्या देशात सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे सांगून त्यांनी मासवे संघटनेचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काशिनाथ पवार यांनी केले. तर आभार प्रा. भाग्यश्री भुजबळ यांनी मानले. या कार्यक्रमात अनिल मुंडे, माने आकांक्षा, अंजली गर्जे, काळे शिवानी, प्रशांत सुरवसे या विद्यार्थ्यांनी शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या उपक्रमाविषयी विविध क्षेत्रकार्य संस्था व समुदायात घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा आपल्या मनोगत आतून व्यक्त केला. या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वात शेवटी सामूहिक राष्ट्रगीताने समाजकार्य पंधरवाडा या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिनेश मौने, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, संतोष येचेवाड, आनंद खोंपे यांनी परिश्रम घेतले.

# २६ ऑगस्टपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात अति मुसळधार पाऊस

पुणे : मागील दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरूच आहे. आज देखील राज्यातील बहुतांश भागात जोरदार पाऊस बरसला. आज शनिवार दि. २४ ऑगस्ट सकाळ ते सोमवार दि. २६ ऑगस्टच्या सकाळपर्यंतच्या ४८ तासांत संपूर्ण महाराष्ट्रात जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.ज्येष्ठ निवृत्त हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी वर्तविलेल्या हवामान अंदाजानुसार पुढील ४८ तासात अति जोरदार पाऊस बरसण्याची शक्यता आहे. त्यानुसार विशेषत: नंदुरबार, धुळे, जळगांव, नाशिक, अहमदनगर, छ. संभाजीनगर, पुणे, सातारा, मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा १४ जिल्ह्यात पुढील ४८ तासात तर अतिजोरदार पावसाचीही शक्यता जाणवते. रविवार दि. २५ ऑगस्टपासून सह्याद्री कुशीतील नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावरील धरणांतून होणा-या जलविसर्गाच्या शक्यतेतून, संबंधित नद्यांच्या खो-यात कदाचित पूर-परिस्थितीही निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE